# महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,पुणे

## शासकीय संगणक टायपिंग प्रमाणपत्र परीक्षा (GCC-TBC) फेब्रु./मार्च - २०२३

## (द्वितीय सत्र - जुलै २०२२ ते डिसें.२०२२)

**(GOVERNMENT CERTIFICATE IN COMPUTER TYPING BASIC COURSE (GCC-TBC) EXAMINATON JANUARY 2023)**

**(SECOND SEMI. - JULY 2022 TO DEC. 2022)**

# *अधिसूचना*
# *व*
# *ऑनलाईन*
# *आवेदनपत्र स्वीकृती कार्यक्रम*

**महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,पुणे**

१७, डॉ. आंबेडकर मार्ग, पुणे ४११००१

**दूरध्वनी क्रमांक□: ०२०-२६१२३०६६/६७**

**E-mail - mscegcctbc@gmail.com**

**Website : www.mscepune.in**

**महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेतील शासकीय संगणक टायपिंग प्रमाणपत्र परीक्षा (जीसीसी-टीबीसी) फेब्रु./मार्च-२०२३**

# (द्वितीय सत्र - जुलै २०२२ ते डिसें. २०२२)

# परीक्षेशी संबंधित अधिकारी

| अ. क्र. | नाव | पद |
|---|---|---|
| १. | श्री. महेश पालकर | अध्यक्ष |
| २. | श्रीमती शैलजा दराडे | उपायुक्त तथा आयुक्त |
| ३. | श्रीमती संगीता घोडेकर | सहाय्यक आयुक्त |
| ४. | श्री. उत्तम खरात | अधीक्षक  (जीसीसी प्रशासन) |
| ५. | श्री. अनिल सोनार | मूल्यमापन अधिकारी (सेवानिवृत्त) |
| ६. | श्रीमती संगीता चव्हाण | लेखाधिकारी |
| **ऑनलाईन माहिती भरताना काही तांत्रिक अडचणी आल्यास त्या करीता ०२०२६१२३०६६/६७ या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क करावा.** | | |

## <u>महत्त्वाचे</u>

**१)** **ऑनलाईन आवेदनपत्र भरण्याच्या प्रक्रियेत महत्त्वाचे बदल करण्यात आले आहेत.**

**२)** **अधिसूचनेचे व संकेतस्थळावरील सर्व सूचनांचे काळजीपूर्वक वाचन करावे.**

**३)** **कृतीओघ तक्त्याचे (FlowChart) अवलोकन करुनच आवेदनपत्रे भरावीत.**

**४)** **संस्था नुतनीकरण प्रत ऑनलाईन पद्धतीने भरल्याशिवाय विद्यार्थ्यांचे ऑनलाईन आवेदनपत्रे भरता येणार नाहीत.**

**५)** **आवेदनपत्र भरताना फोटो, नाव, सही बाबत कोणत्याही प्रकारच्या चुका होणार नाहीत याची दक्षता विद्यार्थ्यांनी व संस्थाचालक यांनी घ्यावी.**

**६)** **आवेदनपत्रे भरल्यानंतर ऑनलाईन एकत्रित शुल्क भरणे आवश्यक आहे. यासाठी स्वतंत्र कालावधी दिला जाणार नाही.  ऑनलाईन बँकीग, क्रेडीट/ डेबीट कार्डाद्वारे विहित मुदतीत शुल्क भरण्याची दक्षता घ्यावी.**

**(चलन प्रिंट काढून बँकेत जाऊन रक्कम भरण्याचा पर्याय उपलब्ध नाही.)**

**७)** **केंद्र निश्चिती शिक्षणाधिकारी (माध्यमिक)/ उपसंचालक यांचे मार्फत केली जाईल.**

**परीक्षा प्राधान्य**

जा. क्र.मरापप/जीसीसी/प्रशा/सं.टा./अधिसूचना/ फेब्रु./मार्च-२०२३/५४८९
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
१७, डॉ. आंबेडकर मार्ग, पुणे-०१
दिनांक :- ३०/११/ २०२२.

**प्रति,**

**संस्थाचालक / प्राचार्य,**
**सर्व शासनमान्य संगणक टायपिंग संस्था,**
**महाराष्ट्र व गोवा राज्य.**

विषय :- **शासकीय संगणक टायपिंग प्रमाणपत्र परीक्षा (GCC-TBC ३० व ४० श.प्र.मि.) फेब्रु./मार्च - २०२३ अधिसूचना व ऑनलाईन नोंदणीसह आवेदनपत्र स्वीकृती कार्यक्रम.**

महाराष्ट्र व गोवा राज्यातील शासनमान्यता प्राप्त संगणक टायपिंग संस्थामधील नियमित विद्यार्थ्यांसाठी महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत **शासकीय संगणक टायपिंग प्रमाणपत्र परीक्षा (GCC-TBC मराठी/हिंदी/इंग्रजी ३० व ४० श.प्र.मि.) फेब्रु./मार्च-२०२३ ची परीक्षा ऑनलाईन पद्धतीने घेणेचे प्रस्तावित आहे.**

द्वितीय सत्र - जुलै २०२२ ते डिसें. २०२२ या सत्रासाठी विद्यार्थ्यां-ना प्रवेश देऊन त्यांची ऑनलाईन नोंदणी परिषदेच्या संकेतस्थळावर केली आहे. त्याच परीक्षार्थ्यांची ऑनलाईन आवेनपत्रे **फेब्रु./ मार्च - २०२३ प्रस्तावित परीक्षेसाठी भरता येतील.**

मागील परीक्षेत अनुत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना पुनर्परीक्षार्थी (रिपीटर) म्हणून **फेब्रु./मार्च - २०२३ प्रस्तावित परीक्षेसाठी प्रविष्ठ होता येईल.**

**अ) परीक्षेस पात्र होण्यासाठीचे निकष :**

१. उमेदवार शासनमान्य शाळेतून किमान ८ वी उत्तीर्ण असावा.
२. शासनमान्य संगणक टायपिंग संस्थेत नियमित विद्यार्थी म्हणून प्रशिक्षण पूर्ण केलेले असावे.
३. विद्यार्थ्यांची नोंदणी ऑनलाईन पद्धतीने संबंधित संस्थेमार्फत केलेली असावी.

**आ) शुल्क :-**

१. **परीक्षा शुल्क** :- रु. ५००/- प्रतिविषय/प्रतिविद्यार्थी (नियमित)
रु. ५००+ १००/- प्रतिविषय/प्रतिविद्यार्थी (विलंब)
रु. ५००+१००+अतिविलंब शुल्क रु. ५०/- (प्रति परीक्षार्थी, प्रति विषय, प्रति दिन)

**शासकीय संगणक टायपिंग प्रमाणपत्र परीक्षा (GCC-TBC) फेब्रु./ मार्च - २०२३ मधील विद्यार्थ्यांची नोंदणी तसेच नियमित, विलंब व अतिविलंब शुल्कासह आवेदनपत्र भरणेस लिंक देणेबाबत.**

**शासकीय संगणक टायपिंग प्रमाणपत्र परीक्षा (GCC-TBC) परीक्षांमधील आवेदनपत्रातील त्रुटी जसे परीक्षार्थ्याचे स्वत:चे नाव, आडनाव, वडीलांचे/पतीचे नाव, आईचे नाव, विषय बदल, फोटो बदल, बॅच बदल, केंद्र बदल इ. कोणत्याही प्रकारची दुरुस्ती करुन दिली जाणार नाही, याची संबंधित संस्थाचालकांनी व विद्यार्थ्यांनी याची नोंद घ्यावी.**

**तसेच विद्यार्थ्याच्या नावात, आडनावात, वडीलांच्या/पतीच्या नावात किंवा आईच्या नावात फक्त अपवादात्मक परिस्थितीत स्पेलिंग दुरुस्ती असेल विद्यार्थ्याचे नाव/ आडनाव/ वडीलांचे नावात बदल होत नसेल तरच दुरुस्ती करुन देण्यात येईल.**

उपरोक्त विषयानुसार शासकीय संगणक टायपिंग प्रमाणपत्र परीक्षा (GCC-TBC) फेब्रु./मार्च - २०२३ (व्दितीय सत्र जुलै - २०२२ ते डिसें.२०२२) परीक्षांसाठी विद्यार्थ्यांची नोंदणी शुल्कासह आवेदनपत्र भरणेसाठी दि. ०१/१२/२०२२ ते १५/१२/२०२२ या कालावधीत लिंक उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

**खालील तक्त्यात दर्शविल्यानुसार नियमित, विलंब व अतिविलंब शुल्क आकारुन आवेदनपत्र भरता येईल.**

| अ.क्र. | तपशील | कालावधी | शुल्क आकारणी |
|---|---|---|---|
| १. | परीक्षेच्या अधिसूचनेपासून | १५ दिवस | नियमित शुल्क रु ५००/- (प्रति विषय, प्रति विद्यार्थी) |
| २. | नियमित शुल्काच्या मुदतीनंतर विलंब शुल्कासह आवेदनपत्र भरणे. | २ दिवस | नियमित शुल्क रु. ५००/- + विलंब शुल्क रु १००/- (प्रति विषय, प्रति विद्यार्थी) |
| ३. | विलंब शुल्काच्या मुदतीनंतर अतिविलंब शुल्कासह आवेदनपत्र भरणे. | २ दिवस | नियमित शुल्क ५००/- + विलंब शुल्क १००/- + अतिविलंब शुल्क रु. ५०/- (प्रति परीक्षार्थी, प्रति विषय, प्रति दिन) |

**तसेच अपवादात्मक परिस्थितीत विद्यार्थ्याच्या नावात, आडनावात, वडिलांच्या/ पतीच्या नावात किंवा आईच्या नावात फक्त स्पेलिंग दुरुस्ती असेल तरच परीक्षेपुर्वी रु. २००/- दंड आकारुन देण्यात येईल.**

| अ.क्र. | तपशील | कालावधी | शुल्क आकारणी |
|---|---|---|---|
| १. | परीक्षेच्या अधिसूचनेपासून १९ दिवसांपर्यंत दुरुस्ती लिंक सुरु राहील. | १९ दिवस | विनाशुल्क |
| २. | प्रवेशपत्र निर्गमित झाल्यापासून परीक्षेपूर्वी पर्यंत | परीक्षेपूर्वी ३ दिवस अगोदर | रु. २००/- |

**प्रवेशपत्र निर्गमित झाल्यापासून परीक्षेपूर्वीची फक्त स्पेलिंग दुरुस्ती (विद्यार्थ्याचे नाव/ आडनाव/ वडिलांच्या/पतीच्या किंवा आईच्या नावात बदल) होत असल्यास रु. २००/- दंड आकारुन देण्यात येईल. परंतू याबाबतचा प्रस्ताव समक्ष परीक्षा परिषदेत येऊन परीक्षेपुर्वी सादर करावा.**

**महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेचे दि. १९/१०/२०१९ चे परिपत्रकान्वये परीक्षेनंतर संस्थाचालकांनी जुलै - २०१९ व त्या पुढील परीक्षांमधील विद्यार्थ्यांचे नाव, वडिलांचे / पतीचे नाव, आडनाव,आईचे नावाचे स्पेलिंग दुरुस्त्या ह्या प्रस्तावास लागणारी कागदपत्रे पूर्ण केल्यानंतरच करुन देण्यात येईल. सदर प्रस्तावानुसार स्पेलिंग दुरुस्तीमुळे पूर्ण नावात, विद्यार्थ्यांच्या नावात, वडिलांच्या / पतीच्या नावात, आडनावात, आईच्या नावात पूर्ण बदल होत असल्यास अशा दुरुस्त्या करुन दिल्या जाणार नाहीत.**

१. **नोंदणी शुल्क** :- संगणक टायपिंग संस्थांसाठी रु. १०००/- प्रतिवर्षी.
(नोंदणी शुल्क जानेवारी ते डिसेंबर २०२२ या कालावधीसाठी आकारण्यात येईल. परीक्षा शुल्काच्या ऑनलाईन चलनात नोंदणी शुल्क समाविष्ट केले जाईल.)

**इ) शुल्क भरण्याची पध्दत** :-

१. संस्थेने सर्व विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क परिषदेच्या संकेतस्थळावर देण्यात आलेल्या **लिंकवर संस्था लॉगीनद्वारे ऑनलाईन पद्धतीने भरावे. ( चलनाद्वारे किंवा ऑफलाईन पद्धतीने शुल्क भरु नये.)**

२. ऑनलाईन पद्धतीने शुल्क भरुन चलन अपडेट झाल्याशिवाय आवेदनपत्र भरण्याची प्रक्रिया पूर्ण होणार नाही याची नोंद घेण्यात यावी. **(इतर कोणत्याही पद्धतीने परीक्षा शुल्क भरण्यात येऊ नये, ते ग्राह्य धरण्यात येणार नाही व शुल्क परत करण्यात येणार नाही.)**

३. नियमित शुल्क कोणत्याही कारणामुळे विहित कालावधीत न भरल्यास विलंब व अतिविलंब शुल्क लागू होईल.

**उ) परीक्षेची ऑनलाईन आवेदनपत्रे स्विकृतीचा कार्यक्रम :-**

| अ.क्र. | कालावधी | शुल्क प्रकार | शुल्क (रक्कम) रुपये |
|---|---|---|---|
| **१.** | **दि. १/१२/ २०२२ ते दि. १५/१२/२०२२** | **परिक्षार्थ्यांचे नियमित शुल्कासह आवेदनपत्र भरणे** | **५००/- (प्रतिविषय, प्रति परिक्षार्थी)** |
| **२.** | **दि. १६/१२/ २०२२ ते दि. १७/१२/२०२२** | **परिक्षार्थ्यांचे विलंब शुल्कासह आवेदनपत्र भरणे** | **(५००/- + १००/-) (प्रतिविषय, प्रति परिक्षार्थी)** |
| **३.** | **दि. १८/१२/ २०२२ ते दि. १९/१२/२०२२** | **परिक्षार्थ्यांचे अतिविलंब शुल्कासह आवेदनपत्र भरणे** | **(५००/- + १००/-) + ५०/- (प्रतिविषय, प्रति परिक्षार्थी, प्रति दि[illegible])** |

**टिप :-** * संस्थाचालकांनी उपरोक्त वेळापत्रकाप्रमाणे कार्यवाही करावी. ऑनलाईन प्रक्रियेमुळे उपरोक्त कोणत्याही टप्प्यावर विलंब होता कामा नये

* ऑनलाईन आवेदनपत्राची एक प्रिंट काढून विद्यार्थ्यांची स्वाक्षरी, संस्थेच्या स्वाक्षरी व शिक्क्यासह संबंधित संस्थेने आपल्या दप्तरी जतन करुन ठेवावी.

**ई) बँकेचे चलन वाटप :-**

परीक्षा शुल्क केवळ ऑनलाईन पद्धतीने संस्था लॉगिनद्वारे भरावयाचे असल्याने ऑफलाईन चलन देण्यात येणार नाही.
**(चलनाने शुल्क भरल्यास ते ग्राह्य धरले जाणार नाही..)**

**उ) आवेदनपत्राची उपलब्धता:-**

आवेदनपत्रे परिषदेच्या संकेतस्थळावर ऑनलाईन पद्धतीने भरावयाची आहेत. सदरची आवेदनपत्रे परिषदेच्या संकेतस्थळावर दि. ०१ / १२ /२०२२ पासून उपलब्ध करुन देण्यात आली आहेत.

# ऑनलाईन आवेदनपत्र भरण्याचा कृतीओघ तक्ता (Flow Chart)

## नियमित (REGULAR)

www.mscepune.in संकेतस्थळाला भेट देणे.

↓

GCC- TBC EXAMINATION या Tab वर क्लिक करा.

↓

ID व Password द्वारे Login करा.

↓

GCC-TBC Tab वर क्लिक करणे

↓

संगणक टायपिंग नुतनीकरण आदेश UPLOAD करणे.

↓

GCC-TBC Application form वर क्लिक करणे

↓

सर्व परीक्षार्थ्यांची माहिती अचूक भरल्याची पुन्हा खात्री करुनच Submit बटनावर क्लिक करा.

↓

भरलेल्या आवेदनपत्राची प्रिंट काढून त्यावर परिक्षार्थी व संस्थाचालकांनी स्वाक्षरी करुन दप्तरी जपून ठेवावी.

↓

GCC-TBC Online Payment Tab वर क्लिक करुन विहित मुदतीत ऑनलाईन पद्धतीने संस्था लॉगीनद्वारे परीक्षा शुल्क भरावे.

↓

सर्व परीक्षार्थ्यांची आवेदनपत्रे भरुन झाल्यानंतरच Exam Candidates list ची प्रिंट घ्यावी

# ऑनलाईन आवेदनपत्र भरण्याचा कृतीओघ तक्ता (Flow Chart)

## पुनर्परिक्षार्थी (REPEATAR)

www.mscepune.in संकेतस्थळाला भेट देणे.

⇩

GCC - TBC Examination या Tab वर क्लिक करा.

⇩

ID व Password द्वारे Login करा.

⇩

GCC-TBC Tab वर क्लिक करा.

⇩

संगणक टायपिंग नुतनीकरण आदेश UPLOAD करणे.

⇩

GCC-TBC Application Form Repeater वर क्लिक करावे.

⇩

Candidates List समोरील Apply बटनावर क्लिक करून त्यामधील मुद्देनिहाय अचूक माहिती भरा.

⇩

Apply केलेल्या सर्व परीक्षार्थ्यांच्या यादीचे अवलोकन करणे.

⇩

भरलेल्या आवदेनपत्राची प्रिंट काढून त्यावर परीक्षार्थी संस्थाचालकांनी स्वाक्षरी करुन दप्तरी जपून ठेवावी.

⇩

GCC-TBC Online Payment Tab वर क्लिक करुन विहित मुदतीत ऑनलाईन पद्धतीने संस्था लॉगीनद्वारे परीक्षा शुल्क भरावे.

⇩

सर्व विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे भरून झाल्यानंतरच Exam Candidates list ची प्रिंट घ्यावी

**ऐ) ऑनलाईन आवेदनपत्र भरण्याबाबत सूचना :-**

**A. सर्वसाधारण सूचना :-**

१. ऑनलाईन आवेनपत्र भरण्याकरीता प्रथमत: परिषदेच्या www.mscepune.in या संकेतस्थळास भेट द्यावी.

२. सदर संकेत स्थळावरील G.C.C.-T.B.C. Exmination वर Click करावे. त्यानंतर स्क्रीनवर Login चा बॉक्स दिसेल त्यामध्ये दिलेली माहिती संस्था कोड व पासवर्ड द्वारे भरावी व Login करावे.

३. ऑनलाईन आवेदनपत्र भरताना चुका होऊ नयेत म्हणून संस्थाचालकांनी / प्राचार्यांनी परीक्षार्थ्यांचा उपस्थितीत आवेदनपत्र अचूक भरावे.

४. **स्क्रिनवर नोंदणी केलेल्या व आवेदनपत्र परीक्षार्थ्यांची यादी दिसेल.**

५. आवेदनपत्र भरताना अंध परीक्षार्थ्यांबाबत सनेत्रवाचक (मदतनीस) हवा असल्यास सनेत्र वाचकाची माहिती अचूक भरावी.सनेत्रवाचक एकदा निश्चित केल्यानंतर सनेत्रवाचकाच्या नावात बदल करता येणार नाही.

६. **Update केलेल्या आवेदनपत्राची प्रिंट काढून ठेवावी. त्यावर परीक्षार्थी व संस्थाचालकांनी स्वाक्षरी करुन नाव व संस्था कोड लिहावा व आपल्या दप्तरी जपून ठेवावी.**

७. परीक्षा परिषदेकडून घेण्यात येणाऱ्या जीसीसी-टीबीसी आवेदनपत्र भरल्यानंतर परिषदेकडून त्यानुसारच प्रवेशपत्र निर्गमित केली जातात. तथापि परीक्षेनंतर नावांमधील स्पेलिंग दुरुस्त्या तसेच पूर्ण नाव दुरुस्तीचे प्रस्ताव या कार्यालयाकडे सादर होतात. याचाच अर्थ संस्थाचालकांकडून आवेदनपत्र भरताना पूर्णपणे दक्षता घेतली जात नाही. असे निदर्शनास येते.

८. वरील प्रकारच्या चुका होऊ नयेत यासाठी संस्थाचालकांनी आवेदनपत्र भरताना विद्यार्थ्यांची आवश्यक ती माहिती विद्यार्थ्यांच्या मूळ कागदपत्रावरुन (शाळा सोडल्याचा दाखला / शाळेचे बोनाफाईड प्रमाणपत्र १० वी / १२ वी गुणपत्रक / प्रमाणपत्र) पडताळणी करुन आवेदनपत्र भरावेत.

**ओ) संस्थाप्रमुख व परीक्षार्थी यांच्यासाठी महत्त्वाच्या बाबी :-**

१. **सदर परीक्षा ही फक्त जीसीसी-टीबीसी मराठी /हिंदी/ इंग्रजी ३०/४०श.प्र.मि. ची आहे.**

२. **संस्थेने आपल्या संस्थेतील परीक्षार्थ्यांचे नोंदणी (Regitration) आवेदनपत्र (Application Form) पूर्ण भरल्यानंतर आवेदनपत्राची प्रिंट काढून ठेवावी. नाव, विषय, गती, सही, फोटो बरोबर, असल्याची खात्री करुन विद्यार्थ्यांची स्वाक्षरी घ्यावी. सदर आवेदनपत्राची प्रत संस्थेत जतन करुन ठेवावी.**

**प्रवेशपत्र निर्गमित झाल्यानंतर वा परीक्षेनंतर कोणताही बदल केला जाणार नाही. संगणकीय / मुद्रण दोषामुळे चूक झाल्यास जतन केलेल्या आवेदनपत्राची प्रत सादर केल्यानंतरच प्रमाणपत्रावर दुरुस्ती केली जाईल.**

३. **परिषदेकडून देण्यात आलेली बॅच मध्ये कोणताही बदल केला जाणार नाही. परीक्षार्थ्यांना शक्यतो टंकलेखन संस्थेच्या जवळचे परीक्षा केंद्र परिषदेकडून दिले जाईल. मात्र कमी विद्यार्थी संख्या, आवश्यक साधनसामग्रीची उपलब्धता न होणे या बाबींमुळे अन्य /दूरचे परीक्षा केंद्र दिले जाईल. परीक्षा परिषदेच्या स्तरावरुन देण्यात आलेले परीक्षा केंद्र कोणत्याही परिस्थितीत केंद्र बदल कला जाणार नाही.**

४. परीक्षेपूर्वी अंदाज ५ दिवस अगोदर पात्र परीक्षार्थ्यांची प्रवेशपत्रे (हॉल तिकीट) संस्थांना परिषदेच्या संकेतस्थळावर संस्थांच्या लॉगिनमध्ये ऑनलाईन दिली जातील. त्यानुसार संस्थांनी आपल्या संस्थेतील सर्व परिक्षार्थ्यांच्या प्रवेशपत्राची प्रिंट काढून संस्थेच्या सही व शिक्क्यासह परिक्षार्थ्यांना वितरीत करावीत.

५. **परीक्षार्थीनी भरलेले परीक्षा शुल्क कोणत्याही सबबीवर परत मिळणार नाही याची उमेदवारांनी व संस्थाचालकांनी नोंद घ्यावी. त्यामुळे अतिरिक्त शुल्क भरण्यात येवू नये.**

६. परीक्षा शुल्काच्या ऑनलाईन पावतीवर दिनांक, संस्थेचे नाव व सांकेतांक असल्याची खात्री करावी.

७. **दिव्यांग (अंध) विद्यार्थ्यांबाबत :-** अंध विद्यार्थ्यांना इंग्रजी टंकलेखन ३० श.प्र.मि. परीक्षेस मदतनीस (सनेत्र वाचक) घेऊन बसण्यासाठी शासनाने शासन निर्णय शालेय शिक्षण विभाग क्र. बीजीई २००१/९३९७५/(१९०/२००१)/साशि-१, दि. १०/१०/२००१ नुसार मान्यता दिलेली आहे. तसेच अंध विद्यार्थ्यांना सनेत्र (मदतनीस) वाक्य, शब्द वाचल्यानंतर ते टंकलिखित करण्यास उशीर लागण्याची शक्यता लक्षात घेऊन टंकलेखन परीक्षेच्या विभाग दोन साठी (गती उतारा) ७ मिनिटांऐवजी १० मिनीटे म्हणजेच ३ मिनिटे अतिरिक्त वेळ दण्यास शासनाने शासन निर्णय, शालेय शिक्षण विभाग क्र. बीजीई २००१/९३९७५/(१९०/२००१)/साशि-१, दि.३१ डिसेंबर २००१ नुसार मान्यता दिलेली आहे. ही सवलत GCC-TBC परीक्षेसाठीही लागू राहील.

८. **दिव्यांग (अस्थिव्यंग) विद्यार्थ्यांबाबत :-** दिव्यांग विद्यार्थ्यांना टंकलेखन कौशल्य प्राप्त करण्यासाठी आवश्यक असणाऱ्या अवयवामध्ये म्हणजे हात किंवा बोटे यामध्ये ४० % टक्के किंवा त्याहून अधिक कायम स्वरुपी दिव्यांगत्व आलेले असल्यास व जिल्हा शल्य चिकित्सकांनी (जिल्हा सिव्हिल सर्जन) तसे प्रमाणीत केलेले असल्यास ३० श.प्र.मि. गतीची परीक्षा, या टंकलेखनाच्या परीक्षेतील गती उताऱ्यासाठी दिव्यांग उमेदवारास ७ मिनिटांऐवजी १० मिनीटे म्हणजेच ३ अधिक मिनीटांची सवलत देण्यास शासनाने, शालेय शिक्षण विभाग, शासन निर्णय क्र. परीक्षा -२०१५/प्र.क्र.२७२/एस.डी.२,दि. २० ऑक्टोबर २०१६ नुसार मान्यता दिलेली आहे. ही सवलत GCC-TBC परीक्षेसाठीही लागू राहील.

९. आवेदनपत्रात खोटी माहिती देणे, आवेदनपत्रासोबतच्या दस्तऐवजात खाडाखोड करुन सादर करणे या कारणांमुळे उमेदवार परीक्षेसाठी कोणत्याही टप्प्यावर अपात्र ठरेल व त्याची / तिची सदर परीक्षेची संपादणूक रद्द होईल. तसेच संबंधित संस्थेचा सांकेतांक रद्द करण्यात येईल.

१०. परीक्षार्थी, संस्थाप्रमुख व प्राचार्य यांनी आवेदनपत्रावरील Submit या बटनावर क्लिक करण्यापूर्वी आवेदनपत्रामधील आवश्यक असलेले सर्व रकाने बरोबर भरले असल्याची खात्री करावी.

**११. संस्थाचालकांनी संस्था नुतनीकरण न करता विद्यार्थी परीक्षेस प्रविष्ठ करु नयेत. विद्यार्थी परीक्षेस प्रविष्ठ केल्याचे निदर्शनास आल्यास आपल्या संस्थेचा सांकेतांक रद्द करण्यात येईल.**

**१३. परीक्षार्थीचे एक विषयासाठी एकच आवेदनपत्र भरावे. एकाच विषयाची एकापेक्षा जास्त आवेदनपत्रे भरल्यास त्या विषयाची सर्व आवेदनपत्रे रद्द करण्यात येतील, त्यामुळे याबाबत गांभीर्याने नोंद घ्यावी. परीक्षार्थींनी एकाच विषयाची एकापेक्षा जास्त आवेदनपत्रे त्याच किंवा इतर संस्थेमधून भरली नसल्याची संस्थाप्रमुखांनी खात्री करावी. तसे हमीपत्र परीक्षार्थ्यांकडून घेऊन आपल्या दप्तरी ठेवावे.**

**१४. संस्थाप्रमुखांने कोणत्याही अनधिकृत संगणक टंकलेखन संस्थेच्या परीक्षार्थ्यांचे आवेनदनपत्र आपल्या संस्थेमार्फत भरु नयेत. तसे निदर्शनास आल्यास सदर भरलेली सर्व ऑनलाईन आवेदनपत्रे रद्द करण्यात येतील व आपल्या संस्थेची शासन मान्यता काढून घेण्याबाबतची कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घेण्यात यावी.**

**१५.विद्यार्थी /संस्थाचालक यांनी आवेदनपत्रात नमूद केलेली माहिती चुकीची आढळल्यास सदर विद्यार्थ्याचा निकाल कोणत्याही टप्प्यावर रद्द केला जाईल.**

**१६. विद्यार्थ्यांचे बॅच बदल, विषय बदल याबाबतचे ई-मेलव्दारे अथवा प्रत्यक्ष/ समक्ष प्राप्त होणरे प्रस्ताव/अर्ज यांची दखल घेतली जाणार नाही. याची नोंद सर्व संबंधितांनी घ्यावी.**

*स्वाक्षरीत/-*
**आयुक्त**
**महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,**
**पुणे-४११ ००१**

**प्रत माहितीस्तव व कार्यवाहीस्तव:-**

१. विभागीय शिक्षण उपसंचालक सर्व, महाराष्ट्र राज्य.
२. शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद सर्व, महाराष्ट्र राज्य.
३. शिक्षण निरीक्षक, बृह-मुंबई (उत्तर/दक्षिण/पश्चिम)

**प्रत माहितीस्तव सविनय सादर:-**

१. मा. सचिव, शालये शिक्षण व क्रिडा विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
२. मा.आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे-०१

# परीक्षा विद्यार्थी यादी मु

## G.C.C. EXAMINATION (GCC-TBC- ३० & ४० W.P.M.) FEB./ MARCH-2023 Candidate list

**PAGE NO. :** ______

**NAME OF THE INSTITUTE :** ____________________________________________

**INSTITUTE CODE NO.:** ______

*USE CODE NUMBERS ONLY ( To be filled in by the Head of the Institute )

| Sr. No. | Name Of The Candidate | Form No. | Instt. Gen. Register No. | Subject Code No. | Signature Of Candidate |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

This is to Certify that the above enlisted candidates are the bonafide students of this Institute. They have fulfilled all the conditions required for appearing at the GCC- TBC Examination as per the rules and each candidates has signed personally.

* **Subject Code :- १) English GCC-TBC ३० W.P.M. = १५, २) Marathi GCC-TBC ३० W.P.M. = २५, ३) Hindi GCC-TBC ३० W.P.M. = ३५,**
**४) English GCC-TBC ४० W.P.M. = १६, ५) Marathi GCC-TBC ४० W.P.M. = २६, ३) Hindi GCC-TBC ४० W.P.M. = ३६,**

**SEAL OF THE INSTITUTE**
**Phone No.---------------------------**
**E-mail Id. -----------------------------**

**SIGNATURE**
**HEAD OF THE INSTITUTE**

# TIME TABLE

## MAHARASHTRA STATE COUNCIL OF EXAMINATION, PUNE

## GCC-TBC EXAMINATION FEBRUARY/MARCH -2023 TIME TABLE

## ENGLISH 30 W.P.M. & 40 W.P.M.

| DAY TIME | TUESDAY 14/02/2023 | | WEDNSEDAY 15/02/2023 | | THURSDAY 16/02/2023 | | FRIDAY 17/02/2023 | | SATURDAY 18/02/2023 | | MONDAY 20/02/2023 | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | ENGLISH -30/40WPM | | | | | | | | | | | |
| | BATCH CODE | SUB CODE | BATCH CODE | SUB CODE | BATCH CODE | SUB CODE | BATCH CODE | SUB CODE | BATCH CODE | SUB CODE | BATCH CODE | SUB CODE |
| 09:00 To 10:30 | 101 | 15 | 201 | 15 | 301 | 15 | 401 | 15 | 501 | 15 | 601 | 15 |
| | | 16 | | 16 | | 16 | | 16 | | 16 | | 16 |
| 11:00 To 12:30 | 102 | 15 | 202 | 15 | 302 | 15 | 402 | 15 | 502 | 15 | 602 | 15 |
| | | 16 | | 16 | | 16 | | 16 | | 16 | | 16 |
| 01:30 To 03:00 | 103 | 15 | 203 | 15 | 303 | 15 | 403 | 15 | 503 | 15 | 603 | 15 |
| | | 16 | | 16 | | 16 | | 16 | | 16 | | 16 |
| 03:30 To 05:00 | 104 | 15 | 204 | 15 | 304 | 15 | 404 | 15 | 504 | 15 | 604 | 15 |
| | | 16 | | 16 | | 16 | | 16 | | 16 | | 16 |
| 05:15 To 06:45 | 105 | 15 RESERVED | 205 | 15 RESERVED | 305 | 15 RESERVED | 405 | 15 RESERVED | 505 | 15 RESERVED | 605 | 15 RESERVED |
| | | 16 RESERVED | | 16 RESERVED | | 16 RESERVED | | 16 RESERVED | | 16 RESERVED | | 16 RESERVED |

**SUBJECT CODE : ENGLISH 30 WPM-15/ MARATHI 30 WPM - 25 / HINDI 30 WPM - 35**

**SUBJECT CODE : ENGLISH 40 WPM- 16/ MARATHI 40 WPM - 26 / HINDI 40 WPM - 36**

**MOCK TEST - 11/02/2023 & 13/02/2023**

**ENGLISH 30/40 MISSING DATA REEXAM - 05/03/2023**

**TIME-TABLE**

**MAHARASHTRA STATE COUNCIL OF EXAMINATION, PUNE**

**GCC-TBC EXAMINATION FEBRUARY/MARCH -2023 TIME TABLE**

**MARATHI/HINDI 30 W.P.M. & 40 W.P.M.**

| DAY TIME | MODAY 27/02/2023 | | TUESDAY 28/02/2023 | | WEDNESDAY 01/03/2023 | | THURSDAY 02/03/2023 | | FRIDAY 03/03/2023 | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | MARATHI/HINDI -30/40WPM | | | | | | | | | |
| | BATCH CODE | SUB CODE | BATCH CODE | SUB CODE | BATCH CODE | SUB CODE | BATCH CODE | SUB CODE | BATCH CODE | SUB CODE |
| 09:00 To 10:30 | 801 | 25,26<br>35,36 | 901 | 25,26<br>35,36 | 1001 | 25,26<br>35,36 | 1101 | 25,26<br>35,36 | 1201 | 25,26<br>35,36 |
| 11:00 To 12:30 | 802 | 25,26<br>35,36 | 902 | 25,26<br>35,36 | 1002 | 25,26<br>35,36 | 1102 | 25,26<br>35,36 | 1202 | 25,26<br>35,36 |
| 01:30 To 03:00 | 803 | 25,26<br>35,36 | 903 | 25,26<br>35,36 | 1003 | 25,26<br>35,36 | 1103 | 25,26<br>35,36 | 1203 | 25,26<br>35,36 |
| 03:30 To 05:00 | 804 | 25,26<br>35,36 | 904 | 25,26<br>35,36 | 1004 | 25,26<br>35,36 | 1104 | 25,26<br>35,36 | 1204 | 25,26<br>35,36 |
| 05:15 To 06:45 | 805 | 25,35 RESERVED<br>26,36 RESERVED | 905 | 25,35 RESERVED<br>26,36 RESERVED | 1005 | 25,35 RESERVED<br>26,36 RESERVED | 1105 | 25,35 RESERVED<br>26,36 RESERVED | 1205 | 25,35 RESERVED<br>26,36 RESERVED |

**SUBJECT CODE : ENGLISH 30 WPM-15/ MARATHI 30 WPM - 25 / HINDI 30 WPM - 35**

**SUBJECT CODE : ENGLISH 40 WPM- 16/ MARATHI 40 WPM - 26 / HINDI 40 WPM - 36**

**MOCK TEST - 24/02/2023 & 25/02/2023**

**MARATHI HINDI 30/40 MISSING DATA REEXAM - 05/03/2023**